आर बी आय/२००६-०७/१७३
डी बी ओडी. क्र. एल ई जी- बीसी - ४२/ ०९.०७.००५/ २००६-०७ नोव्हेंबर १०, २००६

प्रति,

सर्व अनूसुचित व्यापारी बँका
(आर आर बीज सोडून )

प्रिय महोदय,

**ग्राहक सेवा - बदली (डुप्लिकेट ) डिमांड ड्राफ्ट देण्याबाबत**

कृपया आमचे परिपत्रक डी बी ओ डी. क्र. बी सी १४७/०९.०७.००७/ ९९-२०००, दि. मार्च ९, २००० चा संदर्भ घेण्यात यावा. यात, ग्राहकांनी विनती केल्यानंतर १५ दिवसांच्या आत बँकांनी त्यांना बदली डिमांड ड्राफ्ट देण्याचे निर्देश देण्यात आले होते. तसेच, या नियत कालापेक्षा अधिक विलंब केला गेल्यास, या विलंबाची भरपाई म्हणून, त्या रकमेच्या व कालावधीच्या मुदतबंद ठेवींसाठी लागू होणाऱ्या व्याज दराने ग्राहकाला व्याज दिले गेले पाहिजे.

२. वरील परिपत्रकातील ..ग्राहक ही संज्ञा नजरेसमोर ठेवून, एका पंधरवड्याच्या आत बँकांनी बदली डिमांड ड्राफ्ट्स केवळ ते खरेदी करणाराला / लाभार्थीला द्यावेत की, खरेदीदार / लाभार्थीच्या ऐवजी कोणत्याही संलेख धारकाला द्यावेत या बाबत अनेक शंका व्यक्त करण्यात आल्या.

३. या संदर्भात आम्ही हे स्पष्ट करत आहोत की, आमच्या मार्च ९, २००० च्या परिपत्रकात नियत केलेला, बदली डिमांड ड्राफ्ट देण्याचा पंधरा दिवसांचा कालावधी हा केवळ, खरेदीदाराने अथवा लाभार्थीने केलेल्या विनंतीसाठीच असून तिसऱ्याच पक्षाने (ड्राफ्टमागे) सही ( एंडॉर्समेंट) करणाऱ्याच्या बाबत तो लागू होणार नाही.

४. कृपया पोच द्यावी.

आपला विश्वासू,

( प्रशांत सरन)
प्रभारी मुख्य महाव्यवस्थापक